**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१**
दुरध्वनी क्र.२०-२६१२५६९६ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई-मेल आय.डी.क्र. Dydpune@gmail.com वेब साईट-www.dydepune.com
जा.क्र./प्रशि-४/सेवक संच मान्यता/२०१५-१६/ २५८४ दिनांक : 01 DEC 2015

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालय,
पुणे विभाग, पुणे

विषय : अध्यापक विद्यालयांचे सन २०१५-१६ चे संच मान्यता प्रस्तावाबाबत.

संदर्भ : १.मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.६२९, दिनांक २१.२.२०१३ व एनसीटीई निकष २००९ व २०१४

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्र व एनसीटीई निकष २००९ नुसार अध्यापक विद्यालयांची सन २०१५-१६ ची संच मान्यतेबाबत सोबत जोडलेल्या पत्रानुसार जिल्हानिहाय शिबीराचे आयोजन करण्यात आले असून सर्व अध्यापक विद्यालयांनी शिबीरामध्येच संच मान्यता करुन घेणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ मध्ये सेवक संचामध्ये तुकडी वाढ/प्रवेश क्षमता वाढ अथवा घट, माध्यम बदल, अल्पसंख्यांक प्रकारामध्ये बदल, एनसीटीई कोड क्रमांकामध्ये बदल, अनुदानाचा प्रकार, प्रवेशाचा प्रकार बदल (मिश्र/मुलांचे/मुलींचे) इ. बाबीमध्ये बदल झाला असल्यास त्या संबंधी वरिष्ठ कार्यालयाकडील लेखी पत्र प्रस्तावासोबत सादर करावे. वरिष्ठ कार्यालयाचे पत्र नसल्यास बदल ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

संच मान्यता प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्र **अनुक्रमणीकेसह** सादर करावीत.

१.संस्थेचे पत्र.
२.एनसीटीई व एससीईआरटी मान्यता पत्र.
३.अध्यापक विद्यालय अल्पसंख्याक असल्यास अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र.
४.सन २०१३-१४ व २०१४-१५ ची सेवक संच मान्यता प्रत.
५.माध्यम/तुकडी इ. बदल असल्यास त्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडील प्राप्त आदेशाची प्रत.
६.अध्यापक विद्यालयात सध्या मंजूर, कार्यरत व रिक्त, एकूण पदांचा सर्व नावासह तक्ता.
७.प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची- प्रवेश पत्र/व्य.कोटा मान्यता आदेशाचे प्रतीसह यादी.
८.द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची- प्रवेश पत्र/मान्यता आदेशाचे प्रतीसह यादी.
९.बंद अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे समावेशन केले असल्यास त्याची स्वतंत्र यादी सादर करावी.
१०.अनुदानित अध्यापक विद्यालयांनी सेवांतर्गत प्रशिक्षणार्थींची पुराव्यासह सन २०१४-१५ व १५-१६ ची यादी जोडावी.

शिबीरामध्ये अनुपस्थित राहाणा-या अध्यापक विद्यालयांची संच मान्यता कोणत्याही परिस्थितीत शिबीराचे कालावधीनंतर करण्यात येणार नाही, तसेच सदरचे अध्यापक विद्यालय बंद असल्याचे समजून सदर अध्यापक विद्यालयांची संच मान्यता कायम स्वरुपी नाकारण्यात येईल, याची गार्भीयान नोंद घ्यावी.

**सोबत जोडलेल्या अनुदानित/विनाअनुदानित संच मान्यता आदेशाच्या नमुना प्रतीमध्ये सर्व अध्यापक विद्यालयांनी बिनचूक माहिती भरुन स्वाक्षरीसह सदर प्रत शिबीरामध्ये सादर करावी.**

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१